धूतपापेश्वर

आयुर्वेद श्रेष्ठतेची १५० हून अधिक वर्षे

१५० वर्षांहून अधिक



# आरती संग्रह

## ॥ श्री गणेशाय नमः ॥



रोज करा स्वामलाने सुरुवात
धूतपापेश्वर
१५०
वर्षांहून अधिक
स्वामला
हर मौसम में संपूर्ण स्वास्थ्यवर्धक
सुवर्णाने
च्यवनप्राश
समृद्ध
प्रतिकार शक्ति वाढविते
पचनशक्ति सुधारते
शारीरिक क्षमता वाढविते
एकाग्रता आणि लक्ष केन्द्रित करण्यात सुधारणा करते
तारूण्य टिकवून ठेवण्यात मदत करते
आरोग्याच्या पुनर्स्थापनेस मदत करते
प्रत्येक ऋतुसाठी संपूर्ण स्वास्थ्यवर्धक
प्रौढांसाठी
1 मोठा चमचा
(15 ग्रॅम)
दिवसातून दोन वेळा
मुलांसाठी (12+ वर्ष)
1 लहान चमचा
(5 ग्रॅम)
दिवसातून दोन वेळा
दररोज दोन* चमचे,
निरोगी जीवन तुमचे!
Authentic · Standardised · Safe · Efficacious
For Health & Trade Enquiries Tollfree: 1800 22 9874 www.sdlindia.com Now available on amazon

# श्री गणेशपूजा

आपण योजलेली मंगलकार्ये निर्विघ्नपणे पार पडावीत म्हणून श्रीगणपतीची पूजा व आराधना करण्याची चाल आपल्यात आज कैक वर्षे चालू आहे. श्रीगणेशचतुर्थीच्या दिवशी (भाद्रपद शुद्ध चतुर्थी) प्रातःस्नान संध्या पूजादि नित्यविधि करावे. घरातील जागा स्वच्छ सारवून त्यावर रंगीत पाट मांडून, अक्षता पसरून त्यावर श्रीगणपतीची मूर्ती स्थापन करावी व शुचिर्भूतपणें आसनावर बसवून द्विराचमन, प्राणायामादि केल्यावर, 'श्रीपरमेश्वरप्रीत्यर्थं पार्थिवगणपतिपूजनमहं करिष्ये' असा संकल्प म्हणून पाणी सोडावे. कलश, शंख, घंटा व दीप यांना गंध-अक्षता-पुष्प अर्पण करावे. नंतर गणपतीच्या नेत्रांना दुर्वेने तुपाचा स्पर्श करावा व मूर्तीच्या हृदयाला आपल्या उजव्या हाताच्या अंगठ्याने स्पर्श करून प्राणप्रतिष्ठेचे पुढील मंत्र म्हणावेत.

अस्यै प्राणाः प्रतिष्ठंतु अस्यै प्राणाः क्षरन्तु च ।
अस्यै देवत्वमर्चायै मामहेति च कश्चन ।।१।।
रक्तांभीधिस्थपोतोल्लसदरुणसरोजाधिरूढाकराब्जैः ।
पाशं कोदंडभिक्षूद्भवमथ गुणमप्यंकुशं पंचबाणान् ।।
बिभ्राणासृक्कपालं त्रिनयनलसिता पीनवक्षोरुहाढ्या ।
देवी बालार्कवर्णा भवतु सुखकरी प्राणशक्तिः परा नः ।।२।।

**अशी प्राणप्रतिष्ठा झाल्यावर मूर्तीला नमस्कार करून**

एकदंतं शूर्पकर्णं गजवक्त्रं चतुर्भुजं ।
पाशांकुशधरं देवं ध्यायेत्सिद्धिविनायकम् ।।३।।
ध्यायेद्देवं महाकायं तप्तकांचनसंनिभं ।

चतुर्भुजं महाकायं सर्वाभरणभूषितम् ।।४।।
दंताक्षमालापरशुपूर्णमोदकहस्तकं ।
मोदकासक्तशुंडाग्रमेकदंतं विनायकम् ।।५।।

**हे श्लोक म्हणत असता अंतःकरणांत गणेशमूर्तीचे ध्यान करावे**

आवाहयामि विघ्नेश सुरराजार्चितेश्वर ।
अनाथनाथ सर्वज्ञ पूजार्थ गणनायक ।।६।।
श्रीसिद्धिविनायकाय नमः । आवाहयामि ।।

**असे म्हणून मूर्तीला आवाहनसूचक अक्षता अर्पण कराव्यात.**

विचित्ररत्नरचितं दिव्यास्तरणसंयुतं ।
स्वर्णसिंहासनं चारु गृहाण सुरपूजित ।।७।।
श्रीसिद्धिविनायकाय नमः । आसनार्थे अक्षतां समर्पयामि ।

**असे म्हणून मूर्तीला आसनासाठी अक्षता अर्पण कराव्यात.**

सर्वतीर्थसमानीतं पाद्यं गंधादिसंयुतम् ।
विघ्नराज गृहाणेदं भगवन् भक्तवत्सल ।।८।।
श्रीसिद्धिविनायकाय नमः । पादयोः पाद्यं समर्पयामि ।

**असे म्हणून मूर्तीच्या पायांवर फुलाने पाणी अर्पण करावे.**

अर्घ्यं च फलसंयुक्तं गंधपुष्पाक्षतैर्युतम् ।।
गणाध्यक्ष नमस्तेऽस्तु गृहाण करुणानिधे ।।९।।
श्रीसिद्धिविनायकाय नमः । अर्घ्यं समर्पयामि ।

**असे म्हणून पळीभर पाण्यांत गंध, अक्षता पुष्प व सुपारी ठेवून त्यांतले पाणी फुलाने मूर्तीला अर्घ्य म्हणून अर्पण करावे.**

विनायकं नमस्तुभ्यं त्रिदशैरभिवंदित ।
गंगाहृतेन तोयेन शीघ्रमाचमनं कुरु ।।१०।।
श्रीसिद्धिविनायकाय नमः । आचमनीयं समर्पयामि ।

**असे म्हणून मूर्तीच्या हातावर फुलाने आचमनासाठी पाणी अर्पण करावे.**

गंगादिसर्वतीर्थेभ्य आनीतं तोयमुत्तमं ।
भक्त्या समर्पितं तुभ्यं स्नानायाभीष्टदायक ।।११।।
श्रीसिद्धिविनायकाय नमः । स्नानं समर्पयामि ।

**असे म्हणून मूर्तीला स्नान घालण्याची कल्पना करून मूर्तीवर फुलाने पाणी अर्पण करावे.**

पयो दधि घृतं चैव मधुशर्करया युतं ।
पंचामृतेन स्नपनं प्रीयतां परमेश्वर ।।१२।।
श्रीसिद्धिविनायकाय नमः । पंचामृतस्नानं समर्पयामि ।

**असे म्हणून दूध, दही, तूप, मध व साखर ही फुलाने निरनिराळी किंवा एकत्र मूर्तीवर अर्पण करावी आणि त्यानंतर स्वच्छ पाणी अर्पण करावे. याच स्नानप्रसंगी सुगंधी अत्तरे, गरम पाणी ही देखील अर्पण करावी व गणेशथर्वशीर्ष किंवा गणपतिविषयक अन्य स्तोत्रे अथवा अन्य देवांची स्तोत्रे म्हणावीत.**

रक्तवस्त्रयुगं देव दिव्यं कांचनसंभवम् ।
सर्वप्रदं गृहाणेदं लंबोदर हरात्मज ।।१३।।
श्रीसिद्धिविनायकाय नमः । वस्त्रं समर्पयामि ।

**असे म्हणून मूर्तीला वस्त्र अर्पण करावे.**

राजतं ब्रह्मसूत्रं च कांचनं चोत्तरीयकं ।
गृहाण चारु सर्वज्ञ भक्तानां वरदो भव ।।१४।।
श्रीसिद्धिविनायकाय नमः । यज्ञोपवीतं समर्पयामि ।

**असे म्हणून यज्ञोपवीत (जानवे) मूर्तीला अर्पण करावे. हे जानवे मूर्तीच्या डाव्या खांद्यावरून उजव्या हाताखाली असे घालावे.**

कस्तूरीरोचनाचंद्रकुंकुमैश्च समन्वितम् ।।
विलेपनं सुरश्रेष्ठ चंदनं प्रतिगृह्यताम् ।।१५।।
श्रीसिद्धिविनायकाय नमः । चंदनं समर्पयामि।

**असे म्हणून मूर्तीच्या मस्तकाला चंदन लावावे.**

रक्ताक्षतांश्च देवेश गृहाण द्विरदानन ।
ललाटपटले चंद्रस्तस्योपरि विधार्यताम् ।।१६।।
श्रीसिद्धिविनायकाय नमः । अक्षतां समर्पयामि ।

**असे म्हणून अक्षता अर्पण कराव्यात.**

माल्यादीनी सुगंधीनि मालत्यादीनि वै प्रभो ।
मयाहृतानि पूजार्थं पुष्पाणि प्रतिगुह्यताम् ।।१७।।
श्रीसिद्धिविनायकाय नमः । पुष्पाणि समर्पयामि ।

**असे म्हणून अनेक प्रकारची सुवासिक व शोभिवंत फुले, दुर्वा व शमी, आघाडा इत्यादि पवित्र वनस्पतींची पाने गणपतीला अर्पण करावीत.**

दशांगं गुग्गुलं घूपं सुगंधं च मनोहरं ।
गृहाण सर्वदेवेश उमापुत्रं नमोऽस्तु ते ।।१८।।
श्रीसिद्धिविनायकाय नमः । धूपं समर्पयामि ।

**असे म्हणून डाव्या हाताने घंटा वाजवून उजव्या हाताने धूप लावून किंवा उदबत्त्या लावून त्या मूर्तीसमोर ओवाळाव्यात.**

सर्वज्ञ सर्वलोकेश त्रैलोक्यतिमिरापह ।
गृहाण मंगलं दीपं रूद्रप्रिय नमोऽस्तु ते ।।१९।।
श्रीसिद्धिविनायकाय नमः । दीपं समर्पयामि ।

**असे म्हणून निरांजन लावून ते मूर्तीसमोर ओवाळावे.**

नैवेद्यं गृह्यतां देव भक्तिं मेह्यचलां कुरू ।
ईप्सितं मे वरं देहि परत्र च परां गतिम् ।।२०।।
श्रीसिद्धिविनायकाय नमः । नैवेद्यं समर्पयामि ।

**असे म्हणून नैवेद्य दाखवावा.**

पूगीफलं महाद्दिव्यं नागवल्ल्या समन्विंत ।
कर्पूरेलासमायुक्तं तांबूलं प्रतिगृह्यताम् ।।२१।।
श्रीसिद्धिविनायकाय नमः । पूगीफलतांबूलं समर्पयामि ।

**असे म्हणून विडा अर्पण करावा.**

गणाधिप नमस्तेऽस्तु उमापुत्राघनाशन
एकदंतेभवक्त्रेति तथा मूषकवाहन ।।२२।।
विनायकेशपुत्रेति सर्वसिद्धिप्रदायक ।
कुमारगुरवे नित्यं पूजनीयाः प्रयत्नतः ।।२३।।

**हे मंत्र म्हणून एकवीस दुर्वा गणपतीला अर्पण कराव्यात.**

नमःसर्वहितार्थाय जगदाधारहेतवे ।

साष्टाङगोऽयं प्रणामस्ते प्रयत्नेन मया कृतः ।।२४।।

**असा मंत्र म्हणून गणपतीसमोर साष्टांग नमस्कार घालावा.**

यानि कानि च पापानि जन्मान्तरकृतानि च ।
तानि तानि विनश्यन्ति प्रदक्षिण पदे पदे ।।२५।।

**असा मंत्र म्हणून गणपतीला प्रदक्षिणा घालावी किंवा घरात तशी जागा नसेल तर गणपतीसमोर उभे राहून आपण आपल्या सभोवती आपल्या उजव्या हाताकडून फिरावे.**

विनायकेशपुत्र त्वं गणराज सुरोत्तम ।
देहि मे सकलान् कामान् वंदे सिद्धिविनायक ।।२६।।
श्रीसिद्धिविनायकाय नमः । मंत्रपुष्पं समर्पयामि ।।

**असे म्हणून फुले अर्पण करावीत. अशी पूजा झाल्यावर हात जोडून प्रार्थना करावी.**

यन्मयाचरितं देव व्रतमेतत्सुदुर्लभम् ।
गणेश त्वं प्रसन्नः सन् सफलं कुरु सर्वदा ।।२७।।
विनायक गणेशान सर्वदेवनमस्कृत ।
पार्वतीप्रिय विघ्नेश मम विघ्नान्निवारय ।।२८।।
आवाहनं न जानामि न जानामि तवार्चनं ।
पूजां चैव न जानामि क्षम्यतां परमेश्वर ।।२९।।
मंत्रहीनं क्रियाहीनं भक्तिहीनं सुरेश्वर ।
यत्पूजितं मया देव परिपूर्णं तदस्तु मे ।।३०।।
अन्यथा शरणं नास्ति त्वमेव शरणं मम ।

तस्मात्कारूण्यभावेन रक्ष रक्ष परमेश्वर ।।३१।।

**अशी प्रार्थना झाल्यावर पुष्पांजली अर्पण करावी.**

**इति पूजाविधि**

## गणपतिविसर्जनपूजा

श्रीगणपतीचे विसर्जन कुलाचाराप्रमाणे योग्य अशा दिवशी करावे. त्यावेळी गंध, फुले, धूप, दीप, नैवेद्य, दक्षिणा वगैरे उपचारांनी पूजा करावी. प्रत्येक उपचार अर्पण करताना त्या उपचारांचे वरील मंत्र म्हणावे किंवा ''श्रीसिद्धिविनायकाय नमः ।'' असे म्हणावे. पूजा पूर्ण झाल्यावर प्रार्थना करावी; व विसर्जनासाठी

यांतु देवगणाः सर्वे पूजामादाय पार्थिवीम् ।
इष्टकामप्रसिद्ध्यर्थं पुनरागमनाय च ।।२३।।

असा मंत्र म्हणून अक्षता मूर्तीला अर्पण कराव्यात. म्हणजे पूर्वी प्राणप्रतिष्ठेने आलेले देवत्व विसर्जन होते. त्यानंतर मूर्ती स्थिर आसनावरून थोडी पुढे सरकवून ठेवावी आणि मग मूर्ती उचलून समुद्रात किंवा कुलाचाराप्रमाणे योग्य त्या पवित्र स्थळी विसर्जन करावे.

सर्व पूजासमयी देवाला अर्पण केलेले वस्त्र, फल, दक्षिणा वगैरे पदार्थ ब्राह्मणाला अर्पण करावेत.

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १ | गणपतीची आरती (१) | ११ |
| २ | गणपतीची आरती (२) | ११ |
| ३ | गणपतीची आरती (हिंदी) | १२ |
| ४ | शंकराची आरती | १३ |
| ५ | देवीची आरती | १४ |
| ६ | श्रीधोपेश्वराची आरती | १५ |
| ७ | विठ्ठलाची आरती (१) | १८ |
| ८ | विठ्ठलाची आरती (२) | १९ |
| ९ | श्रीज्ञानदेवाची आरती | १९ |
| १० | श्रीकृष्णाची आरती | २० |
| ११ | हनुमानाची आरती | २० |
| १२ | श्रीआर्यादुर्गा मातेची आरती | २१ |
| १३ | दशावतार आरती | २२-२३ |
| १४ | श्रीदत्ताची आरती | २४ |
| १५ | श्रीसत्यनारायणाची आरती | २५ |
| १६ | प्रार्थना | २६ |
| १७ | मंत्रपुष्पांजली | २६ |
| १८ | गणपत्यथर्वशीर्षोपनिषत् | २७-२८ |
| १९ | फलश्रुति | २९ |

# श्रीगणेशाची आरती (१)

सुखकर्ता दुःखहर्ता वार्ता विघ्नाची । नुरवी पुरवी प्रेम कृपा जयाची ।
सर्वांगी सुंदर उटी शेंदुराची । कंठीं झळके माळ मुक्ताफळांची ।
जयदेव जयदेव जय मंगलमूर्ती । दर्शनमात्रें मनःकामना पुरती ।।धृ।।

रत्नखचित फरा तुज गौरीकुमरा । चंदनाची उटी कुंकुमकेशरा।
हिरेजडित मुकुट शोभतो बरा । रुणझुणती नूपुरें चरणीं घागरिया ।।१।।

लंबोदर पीतांबर फणिवरबंधना । सरळ सोंड वक्रतुंड त्रिनयना ।
दास रामाचा वाट पाहे सदना । संकटी पावावें निर्वाणीं रक्षावें सुरवरवंदना।। २।।

# श्रीगणेशाची आरती (२)

नाना परिमळ दूर्वा शेंदुर शमिपत्रे । लाडू मोदक अन्ने परिपूरित पात्रे।
ऐसे पूजन केल्या बीजाक्षर मंत्रे ।। अष्टहि सिद्धि नवनिधि देसी क्षणमात्रे ।।१।।
जय देव जय देव जय मंगलमूर्ती ।। तुझे गुण वर्णाया मज कैची स्फूर्ती ।।जय।।धृ।।
तुझे ध्यान निरंतर जे कोणी करिती ।। त्यांची सकलहि पापे विघ्नेही हरिती ।।
वाजी वारण शिबिका सेवक सुत युवती ।। सर्वहि पावुनि अंती भवसागर तरती ।।
जय देव।।२।।
शरणागत सर्वस्वे भजती तव चरणी ।। कीर्ति तयांची राहें जोंवरी
शशितरणी ।। त्रैलोक्यी ते विजयी अद्भुत हे करणी ।।
गोसावीनंदन रत नामस्मरणी ।। जय देव।।३।।

महारास्नादी काढा
अंगदुखी, सांधेदुखी तसेच
सांध्यांची सूज कमी
करण्यासाठी उपयुक्त

Shree Dhootapapeshwar Standards
SDS Monograph No. 100010
Maharasnadi Kadha
Authentic · Standardised · Safe · Efficacious



# गणपतीची आरती (हिंदी)

शेंदुर लाल चढायो अच्छा गजमुखको ।
दोंदिल लाल बिराजे सूत गौरीहरको ।
हाथ लिये गुडलड्डू साई सुरवरको ।
महिमा कहे न जाय लागत हूं पदको ।
जय जय जी गणराज विद्यासुखदाता ।
धन्य तुम्हारो दर्शन मेरा मन रमता ।। धृ।।

अष्टौसिद्धी दासी संकट को बैरि ।
विघ्नविनाशक मंगल मूरत अधिकारी ।
कोटीसुरजप्रकाश ऐसी छबि तेरी ।
गंडस्थलमदमस्तक झूले शशिबिहारी ।। १।।

भावभगतसे कोई शरणागत आवे ।
संतति संपति सबही भरपूर पावे ।
ऐसे तुम महाराज मोको अति भावे ।
गोसाविनंदन निशिदिन गुण गावे ।। २ ।।



त्रिफला चूर्ण
बद्धकोष्ठता, स्थूलपणा संबंधित विकारांवर उपयुक्त
Authentic · Standardised · Safe · Efficacious
Shree Dhootapapeshwar Standards
SDS Monograph No. 030015
Triphala Choorna

# शंकराची आरती

लवथवती विक्राळा ब्रह्मांडीं माळा ।
विषें कंठ काळा त्रिनेत्रीं ज्वाळा ।
लावण्यसुंदर मस्तकीं बाळा ।
तेथुनियां जळ निर्मळ वाहे झुळझुळां ।। १ ।।
जय देव जय देव जय श्रीशंकरा ।
आरती ओंवाळूं तुज कर्पूरगौरा ।। धृ ।।
कर्पूरगौरा भोळा नयनीं विशाळा ।
अर्धांगीं पार्वती सुमनांच्या माळा ।
विभुतीचें उधळण शितिकंठ निळा ।
ऐसा शंकर शोभे उमावेल्हाळा ।। २ ।।
देवीं दैत्यीं सागरमंथन पै केलें।
त्यामाजी अवचित हळाहळ जे उठिलें ।
तें त्वा असुरपणें प्राशन केलें ।
नीलकंठ नाम प्रसिद्ध झालें ।। ३ ।।
व्याघ्रांबर फणिवरधर सुंदर मदनारी ।
पंचानन मनमोहन मुनिजनसुखकारी ।
शतकोटीचें बीज वाचे उच्चारी ।
रघुकुळटिळक रामदासा अंतरी ।। ४ ।।




**अभयारिष्ट**

बद्धकोष्ठता, मूळव्याध
व भगंदर सारख्या
विकारांवर उत्तम उपाय

Authentic · Standardised · Safe · Efficacious
Shree Dhootapapeshwar Standards
SDS Monograph No. 100022
Abhayarishta

आयुर्वेद श्रेष्ठतेची १५० हून अधिक वर्षे

# देवीची आरती

दुर्गे दुर्घट भारी तुजविण संसारीं ।
अनाथनाथे अंबे करुणा विस्तारीं ।
वारीं वारीं जन्म-मरणातें वारीं ।
हारीं पडलों आता संकट निवारीं ।
जयदेवी जयदेवी महिषासुरमर्दिनी ।

सुरवरईश्वरवरदे तारक संजीवनी ।। धृ ।।
त्रिभुवनभुवनीं पाहतां तुजऐसी नाहीं ।
चारी श्रमले परंतु न बोलवे कांहीं ।
साही विवाद करिता पडलो प्रवाहीं ।
ते तूं भक्तांलागी पावसि लवलाहीं ।। २ ।।

प्रसन्नवदने प्रसन्न होसी निजदासां ।
क्लेशांपासुनि सोडविं तोडीं भवपाशां ।
अंबे तुजवांचून कोण पुरविल आशा ।
नरहरी तल्लीन झाला पदपंकजलेशा ।। ३ ।।


हिंग्वष्टक चूर्ण
भूक न लागणे,
पोट साफ न होणे
आदि पचनासंबंधित
आजारांवर गुणकारी

Authentic · Standardised · Safe · Efficacious
Shree Dhootapapeshwar Standards
SDS Monograph No. 030009
Hingwashtak Choorna

# श्रीधोपेश्वराची आरती

शिवसांब शिवसांब शिव धूतपापा ।
त्वत्सेवक दासाच्या हरिसी भवतापा ।। शिवसांब ।। धृ।।

त्वन्मूर्ति ध्यानीय बहु प्रेमळ आवडते ।
पहाता चंद्र ललाटी मन तल्लीन होते ।
पिंगट जटात गंगाजळ शिरी डळमळते ।
निर्मल पाणी शीतळ सर्वांगी स्त्रवते ।। शिवसांब ।। धृ।।

परिधान व्याघ्रावर रुंडाच्या माळा ।
भासे शुद्ध मयुरा परि कंठाही काळा ।
तृतीय नेत्री निघती दीप्ताग्नि ज्वाळा ।
अंगावर धुंद करे नागाचा मेळा ।। शिवसांब ।। धृ।।


जगदीशा दे मज पादांबुज सेवा ।
आसक्त भ्रमरापरि होऊन रस घ्यावा ।
मायाही जग अवघे उपदेश व्हावा ।
विष्णूने ज्ञानाचा सुदीप लावावा ।। शिवसांब ।। धृ।।




**दशमूलारिष्ट**

कंबरदुखी, स्पाँडिलायटिस
सारख्या वातरोगांवर
प्रभावी उपाय

Shree Dhootapapeshwar Standards
SDS Monograph No. 100005
Dashamoolarishta
Authentic · Standardised · Safe · Efficacious


अनन्त कोटी ब्रम्हांड नायक
श्रीमत् राजाधिराज श्री भवानी शंकर
धूतपापेश्वर महाराज की जय
हर हर महादेव! हर हर महादेव!! हर हर महादेव!!!



शुद्धस्फटिकसंकाशं त्रिनेत्रं पञ्चवक्त्रकम्।
गंगाधरं दशभुजं सर्वाभरणभूषितम्।।
नीलग्रीवं शशांकाकं नागयज्ञोपवीतिनम्।
व्याघ्रचर्मोत्तरीयं च वरेण्यमभयप्रदम्।।
कमण्डल्वक्षसूत्राभ्यामन्वितं शूलपाणिनम्।
ज्वलन्तं पिंगलजटामुद्योतकारिणम्।
अमृतेनाप्लुतं हृष्टमुमादेहार्धधारिणम्।
दिव्यसिंहासनासीनं दिव्याभोगसमन्वितम्।।
दिग्देवतासमायुक्तं सुरासुरनमस्कृतम्।
नित्यं च शाश्वतं शुद्धं ध्रुवमक्षरमव्ययम्।।
सर्वव्यापिनमीशानं रुद्रं वै विश्वरुपिणम्।
एवं ध्यात्वा द्विजः सम्यक्ततो यजनमारभेत्।।

# विठ्ठलाची आरती (१)

युगे अठ्ठावीस विटेवरी उभा ।
वामांगी रखुमाई दिसे दिव्य शोभा ।
पुंडलिकाचे भेटी परब्रह्म आले गा ।
चरणी वाहे भीमा उद्धरी जगा ।
जय देव जय देव जय पांडुरंगा ।
रखुमाई वल्लभा राईच्या वल्लभा ।
पावे जिवलगा ।। जय देव ।। धृ ।।
तुळसी माळा गळा कर ठेवुनी कटी ।
कासे पितांबर कस्तुरी लल्लाटी ।
देव सुरवर नित्य येती भेटी ।
गरुड हनुमंत पुढे उभे राहती ।। जय देव ।। १।।
धन्य वेणुनाद अनुक्षेत्रपाळा ।
सुवर्णाची कमळे वनमाळा गळा ।
राई रखुमाबाई राणीया सकळा ।
ओवाळिती राजा विठोबा सावळा ।। जय देव ।।२।।
ओवाळू आरत्या कुरवंड्या येती ।
चंद्रभागेमध्ये सोडुनिया देती ।
दिंड्या पताका वैष्णव नाचती ।
पंढरीचा महिमा वर्णावा किती ।। जय देव ।।३।।



## गोखरू (त्रिकण्टकादि) काढा

मूत्रवह स्रोतसाच्या
विकारांमध्ये उपयुक्त काढा

Authentic · Standardised · Safe · Efficacious
Shree Dhootapapeshwar Standards
SDS Monograph No. 100102
Gokharu Kadha

धूतपापेश्वर
आयुर्वेद श्रेष्ठतेची १५० हून अधिक वर्षे
१५० वर्षांहून अधिक

# विठ्ठलाची आरती (२)

येई हो विठ्ठले माझे माउलीये ।
निढळावरी कर ठेवुनी वाट मी पाहे ।। धृ ।।
आलिया गेलिया हाती धाडी निरोप ।
पंढरपुरी आहे माझा मायबाप ।। येई.।। १।।
पिवळा पितांबर कैसा गगनी झळकला ।
गरुडावरी बैसोनि माझा कैवारी आला ।। येई. ।।२।।
विठोबाचे राज्य आम्हां नित्य दिपवाळी ।
विष्णुदास नामा जीवेभावे ओवाळी ।। येई. ।।३।।

# श्रीज्ञानदेवाची आरती

आरती ज्ञानराजा । महाकैवल्यतेजा ।
सेविती साधुसंत । मनु वेधला माझा ।। धृ ।।
लोपलें ज्ञान जगीं । हित नेणती कोणी ।
अवतार पांडुरंग । नाम ठेवियले ज्ञानी ।। १।।
कनकाचें ताट करी । उभ्या गोपिका नारी ।
नारद तुंबर हो । साम गायन करी ।। २।।
प्रगट गुह्य बोले । विश्व ब्रह्मची केले ।
रामजनार्दनी । पायी मस्तक ठेविलें ।। ३ ।।




अश्वगंधारिष्ट

शारीरिक व मानसिक
शक्तिवर्धक, स्फूर्तिदायक

Authentic · Standardised · Safe · Efficacious
Shree Dhootapapeshwar Standards
SDS Monograph No. 100003
Ashvagandharishta

# श्रीकृष्णाची आरती

ओंवाळूं आरती मदनगोपाळा । श्यामसुंदर गळा वैजयंतीमाळा ।। धृ ।।
चरणकमल ज्याचे अति सुकुमार । ध्वजव्रजाङ्कुश ब्रीदाते तोडर ।।१।।
नाभिकमलीं ज्याचें ब्रह्मयाचें स्थान । हृदयी पदक शोभे श्रीवत्सलांछन ।।२।।
मुखकमल पाहातां सूर्याच्याकोटी । मोहियेलें मानस कोंदियली दृष्टी ।।३।।
जडितमुगुट ज्याच्या देदीप्यमान । तेणें तेजें कोंदलें अवघे त्रिभुवन ।।४।।
एका जनार्दनीं देखियेले रुप । रुप पाहों जातां झालेसें तद्रूप ।।५।।

# हनुमानाची आरती

सत्राणे उड्डाणे हुंकार वदनी । करि डळमळ भूमंडळ सिंधू जळ गगनी ।
कडाडिले ब्रह्मांड धाके त्रिभुवनी । सुरवर चर निशाचर त्या झाल्या पळनी ।।१।।
जय देव जय देव जय श्री हनुमंता
तुमचेनी प्रसादे नाभे कृतांता जय देव जय देव ।।धृ।।
दुमदुमली पाताळे उठिला प्रतिशब्द । थरथरला धरणीधर मानीला खेद ।
कडाडिले पर्वत उड्डगण् उच्छेद । रामी रामदासा शक्तिचा शोध ।।२।। जय देव



च्यवनप्राश
अष्टवर्ग
स्वास्थ्य एवं
रोगप्रतिरोधशक्तिवर्धक
Authentic · Standardised · Safe · Efficacious
Shree Dhootapapeshwar Standards
SDS Monograph No. 010001
Chyavanprash (AV)

धूतपापेश्वर
आयुर्वेद श्रेष्ठतेची १५० हून अधिक वर्षे
१५० वर्षांहून अधिक

# श्रीआर्यादुर्गा मातेची आरती

जयदेवी जयदेवी जय आर्यादुर्गे। श्री आर्यादुर्गे।
भक्तांना ताराया धावत ये वेगे। जयदेवी ।।धृ।।
सिंहारुढ कुमारी चतुर्भूजा मुर्ती। ढाल, खडग, त्रिशुल नि दैत्यमुंड हाती।।
मुकुटशिरी वक्षावरी मणीमाला रुळती।
आर्यादुर्गा नामे जगी तुझी ख्याती ।।१।। जयदेवी।।
दोन जनांच्या दैन्य स्मरता तू हरिसी। भाविक भक्तांलागी दर्शन तु देसी।।
अखिल चराचर विश्वामाजी तु वससी।
दुर्गे तु दुष्टांचे निर्दालन करिसी ।।२।। जयदेवी।।
सद्भावाने कोणी जे तुजला भजती। त्यांना देसी माते संतति संपत्ती।।
दुर्धर आधी व्याधी तव कृपया नुरती।
ऐशी करुणामुर्ती विलसे तव जगती ।।३।। जयदेवी।।
स्वरुपे तु कौमारी ब्रम्हाचारीणी। सकल त्रैलोक्याची होसी स्वामिनी।।
तुझिया सव्यभागा श्री जाखा जननी।
भक्तालागी येसी हंसोळी धावोनी ।।४।। जयदेवी।।
आम्हा सर्वांची तु कुलस्वामिनी होसी। म्हणूनी आलो दुर्गे तुझिया भेटीसी।।
देई सज्ज - संगति, सद्बुद्धी तैसी।
इतुकी आर्यादुर्गे विनंती तुजपाशी ।।५।। जयदेवी।।
मार्गशीर्ष वद्य अष्टमीचे दिवशी।भगिनी नवदुर्गा येते तव भेटीसी।।
उत्सव उत्साहाने सकल ही जन करिती।
दास विनायक तरला गाऊनिया किर्ती ।।६।। जयदेवी।।

भूनिम्बादि काढा
अम्लपित्त तथा
संबंधित लक्षणांमध्ये
उपयुक्त



Authentic · Standardised · Safe · Efficacious
Shree Dhootapapeshwar Standards
SDS Monograph No. 100045
Bhoonimbadi Kadha

धूतपापेश्वर
आयुर्वेद श्रेष्ठतेची १५० हून अधिक वर्षे
१५० वर्षांहून अधिक

# दशावतार आरती

आरती सप्रेम जय जय विठ्ठल परब्रह्म ।
भक्तसंकटीं नाना स्वरूपीं स्थापिसी स्वधर्म ।।धृ।।

अंबऋषीकारणें गर्भवास सोशीसी ।
वेद नेले चोरूनी ब्रह्मा आणुनियां देसी ।।
मत्स्यरूपी नारायण सप्तही सागर धुंडीसी ।
हस्त लागतां शंखासुरा तुझा वर देसी ।।१।।

रसातळाशीं जातां पृथ्वी पाठीवर घेसी ।
परोपकारासाठीं देवा कांसव झालासी।।
दाढें धरूनी पृथ्वी नेतां वराहरूप होसी ।
प्रल्हादाकारणें स्तंभीं नरहरि गुरगुरसी ।।२।।

पांचवे अवतारीं बळिच्या द्वाराला जासी ।
भिक्षे स्थळ मागुनी बळिला पाताळीं नेसी ।।
सर्व समर्पण केलें म्हणुनि प्रसन्न त्या होसी ।
वामनरूप धरूनी बळिच्याद्वारीं तिष्ठसी ।।३।।



द्राक्षोविन®
स्पेशल
सुप्रीम हेल्थ टॉनिक
द्राक्षासव, अश्वगंधारिष्ट आणि सारस्वतारिष्टाच्या महत्वपूर्ण घटकांपासुन तयार
Authentic · Standardised · Safe · Efficacious
Shree Dhootapapeshwar Standards
SDS Monograph No. 070005
Drakshovin

सहस्रार्जुन मातला जमदग्नीचा वध केला ।
कष्टीं ते रेणुका म्हणुनी सहस्रार्जुन वधिला ।।
निःक्षत्री पृथ्वी दान दिधली विप्राला ।
सहावा अवतार परशुराम प्रगटला ।।४।।

मातला रावण सर्वां उपद्रव केला ।
तेहतीस कोटी देव बंदीं हरलें सीतेला ।।
पितृवचनालागीं रामें वनवास केला ।
मिळोनी वानर सेना राजाराम प्रगटला ।।५।।

देवकीवसुदेव बंदीमोचन त्वां केलें ।
नंदाघरीं जाऊन निजसुख गोकुळा दिधलें ।।
गोरसचोरी करीतां नवलक्ष गोपाळ मिळविले ।
गोपिकांचें प्रेम देखुनि श्रीकृष्ण भुलले ।।६।।

बौद्ध कलंकी कलियुगिं । झाला अधर्म हा अवघा ।
सोडुनि दिधला धर्म म्हणुनि न दिससी देवा ।।
म्लेंच्छमर्दन करिसी म्हणुनि कलंकी केशवा ।
भैरवी जान्हवि द्यावि निजसुखनंदाची सेवा ।।७।।


शीतसुधा®
गरमीपासून सुटका
आणि थंडावा देते




Shree Dhootapapeshwar Standards
SDS Monograph No. 070248
Sheetasudha

# श्रीदत्ताची आरती

त्रिगुणात्मक त्रैमूर्ती दत्त हा जाणा ।
त्रिगुणीं अवतार त्रैलोक्यराणा ।
नेति नेति शब्दें न ये अनुमाना ।
सुरवर मुनिजन योगी समाधि न ये ध्याना ।। १ ।।
जय देव जय देव जय श्रीगुरुदत्ता ।
आरती ओवाळितां हरली भवचिंता ।। धृ ।।
सबाह्य अभ्यंतरीं तूं एक दत्त ।
अभाग्यासी कैंची कळेल ही मात ।
पराही परतली तेथें कैंचा हा हेत ।
जन्ममरणाचाही पुरलासे अंत ।। २ ।।
दत्त येऊनियां उभा ठाकला ।
सद्भावे साष्टांगे प्रणिपात केला ।
प्रसन्न होऊनी आशीर्वाद दिधला ।
जन्ममरणाचा फेरा चुकविला ।। ३ ।।
दत्त दत्त ऐसें लागलें ध्यान ।
हरपले मन झालें उन्मन ।
मीतू पणाची झाली बोळवण ।
एका जनार्दनीं श्रीदत्तध्यान ।। ४।।

गुडूची टॅबलेट
रोगप्रतिकारशक्ति आणि
यकृत् स्वास्थ्यकर

अश्वगंधा टॅबलेट
शारीरिक आणि
मानसिक स्वास्थ्यवर्धक

तुलसी टॅबलेट
रोगप्रतिकारशक्ति वर्धक आणि
श्वसनसंस्थान स्वास्थ्यकर

# श्रीसत्यनारायणाची आरती

जय जय दीनदयाळा सत्यनारायण देवा । पंचारति ओवाळूं श्रीपति तुज भक्तीभावा ।।जय.।।धृ.।। विधियुक्त पूजुनी करिती पुराण श्रवण । परिमळद्रव्यासहित पुष्पमाळा अर्पून । घृतयुक्त शर्करामिश्रित गोधूमचूर्ण । प्रसाद भक्षण करितां प्रसन्न तू नारायण ।।जय.।।१।। शतानंद विप्रे पूर्वी व्रत हे आचरिले । दारिद्र दवडुनि अंती त्यातें मोक्षपदा नेले । त्यापासुनि हें व्रत या कलियुगिं सकळांश्रुत झाले । भावार्थे पूजितां सर्वां इच्छित लाधले ।।जय.।। २।। साधुवैश्यें संततिसाठी तुजला प्रार्थियले । इच्छित पुरतां मदांध होऊनि व्रत न आचरिले । त्या पापाने संकटी पडुनी दुःखहि भोगिले । स्मृति होऊनि आचरिता व्रत त्या तुवांचि उद्धरिलें ।।जय.।। ३।। प्रसाद विसरूनि पतिभेटीला कलावती गेली । क्षोभ तुझा होतांचि तयांचि नौका बुडाली । अंगध्वजरायासि यापरी दुःखस्थिति आली । मृतवार्ता शतपुत्रांची सत्वर कर्णी परिसीली ।।जय.।। ४।। पुनरपि पूजुनि प्रसाद ग्रहण करितां तत्क्षणी । पतिची नौका तरली देखे कलावती नयनी । अंगध्वजरायासि पुत्र भेटती येऊनी । ऐसा भक्तां संकटी पावसि तू चक्रपाणी ।।जय.।। ५।। अनन्यभावें पूजुनि हे व्रत जे जन आचरती । इच्छित पुरविसि त्यांतें देऊनि संतति संपत्ती। संहरती भव दुरिते सर्वहि बंधने तुटती । राजा रंक समान मानुनि पावसी श्रीपती ।।जय.।।६।। ऐसा तव व्रत अपार महिमा वर्णूं मी कैसा । भक्तिपुरःसर आचरती त्यां पावसि जगदीशा । भक्तांचा कनवाळू कल्पद्रुम तू सर्वेशा । मोरेश्वरसुत वासुदेव तुज विनवी भवनाशा ।।जय.।।७।।

| आमलकी टॅबलेट | शतावरी टॅबलेट | ब्राह्मी टॅबलेट | अर्जुन टॅबलेट |
| --- | --- | --- | --- |
| स्वास्थ्य आणि रोगप्रतिकारशक्तिवर्धक | स्त्री स्वास्थ्यकर | मस्तिष्क आणि मनासाठी स्वास्थ्यकर | हृदय स्वास्थ्यकर |

# प्रार्थना

घालीन लोटांगण, वंदीन चरण । डोळ्यांनी पाहीन रुप तुझे।
प्रेमे आलिंगन, आनंदे पूजिन । भावे ओवाळिन म्हणे नामा ।।१।।
त्वमेव माता च पिता त्वमेव । त्वमेव बंधुश्च सखा त्वमेव।
त्वमेव विद्या द्रविणं त्वमेव । त्वमेव सर्वं मम देवदेव ।।२।।
कायेन वाचा मनसेंन्द्रियैर्वा, बुद्ध्यात्मना वा प्रकृतिस्वभावत्।
करोमि यद्यत् सकलं परस्मै, नारायणायेति समर्पयामि ।।३।।
अच्युतं केशवं रामनारायणं कृष्णदामोदरं वासुदेव हरिम्।
श्रीधरं माधवं गोपिकावल्लभं, जानकीनायकं रामचंद्रं भजे ।।४।।
हरे राम हरे राम, राम राम हरे हरे। हरे कृष्ण हरे कृष्ण, कृष्ण कृष्ण हरे हरे

# ।। मंत्रपुष्पांजली ।।

ॐ । यज्ञेन यज्ञमयजन्त देवास्तानि धर्माणि प्रथमान्यासन् ।
ते ह नाकं महिमानः सचंत यत्र पूर्वे साध्याः सन्ति देवाः ।
ॐ राजाधिराजाय प्रसह्यसाहिने नमो वयं वैश्रवणाय कुर्महे ।
स मे कामान् कामकामाय मह्यं कामेश्वरो वै श्रवणो ददातु ।
कुबेराय वैश्रवणाय महाराजाय नमः। ॐ स्वस्ति । साम्राज्यं, भौज्यं,
स्वाराज्यं, वैराज्यं, पारमेष्ठ्यं, राज्यं, महाराज्यमाधिपत्यमयं ।
समन्तपर्या ईस्यात् सार्वभौमः सार्वायुष आंतादापरार्धात्।
पृथिव्यै समुद्रपर्यंताया एकराळिति। तदप्येषश्लोकोऽभिगीतो
मरुतः परिवेष्टारो मरुत्तस्यावसन् गृहे ।
आविक्षितस्य कामप्रेर्विश्वेदेवाः सभासद इति ।



गुलकंद
प्रोप्रायटरी
नैसर्गिक पित्तशामक
आणि दाहनाशक

Authentic · Standardised · Safe · Efficacious
Shree Dhootapapeshwar Standards
SDS Monograph No. 310002
Gulkand

# ।। गणपत्यथर्वशीर्षोपनिषत् ।।

ॐ भद्रं कर्णेभिः शृणुयाम देवाः। भद्रं पश्येमाक्षभिर्यजत्राः ।।
स्थिरैरंगैस्तुष्टुवांसस्तनूभिः । व्यशेम देवहितं यदायुः ।।
स्वस्ति न इन्द्रो वृद्धश्रवाः। स्वस्ति नः पूषा विश्ववेदाः ।।
स्वस्तिनस्तार्क्ष्यो अरिष्टनेमिः । स्वस्ति नो बृहस्पतिर्दधातु ।।
ॐ शांतिः । शांतिः ।। शांतिः ।।।

ॐ नमस्ते गणपतये । त्वमेव प्रत्यक्षं तत्त्वमसि । त्वमेव केवलं कर्ताऽसि । त्वमेव केवलं धर्ताऽसि । त्वमेव केवलं हर्ताऽसि । त्वमेव सर्वं खल्विदं ब्रह्मासि । त्वं साक्षादात्माऽसि नित्यम् ।।१।। ऋतं वच्मि । सत्यं वच्मि ।।२।। अव त्वं माम् । अव वक्तारम् । अव श्रोतारम् । अव दातारम् । अव धातारम् । अवानुचानमव शिष्यम् । अव पश्चात्तात्। अव पुरस्तात् । अव उत्तरात्तात्। अव दक्षिणात्तात् । अव चोर्ध्वात्तात्। अवाधरात्तात्। सर्वतो मां पाहि पाहि समन्तात् ।।३।। त्वं वाङ्‌मयस्त्वं चिन्मयः । त्वमानन्दमयस्त्वं ब्रह्ममयः । त्वं सच्चिदानन्दाद्वितीयोऽसि । त्वं प्रत्यक्षं ब्रह्मासि । त्वं ज्ञानमयो विज्ञानमयोऽसि ।।४।। सर्वं जगदिदं त्वत्तो जायते सर्वं जगदिदं त्वतस्तिष्ठति। सर्वं जगदिदं त्वयि लयमेष्यति। सर्वं जगदिदं त्वयि प्रत्येति । त्वं भुमिरापोऽनलोऽनिलो नभः। त्वं चत्वारि वाक्पदानि।।५।।

महासुदर्शन घन वटी
सर्दी, डोकेदुखी तसेच
अंगदुखी यांवर उपयुक्त

Authentic · Standardised · Safe · Efficacious
Shree Dhootapapeshwar Standards
SDS Monograph No. 3100014
Mahasudarshan Ghana Vati



त्वं गुणत्रयातीतः । त्वं देहत्रयातीतः । त्वं कालत्रयातीतः । त्वं मूलाधारस्थितोऽसिनित्यम् । त्वं शक्तित्रयात्मकः । त्वां योगिनो ध्यायन्ति नित्यम् । त्वं ब्रह्मा त्वं विष्णुस्त्वं रुद्रस्त्वं इन्द्रस्त्वं अग्निस्त्वं वायुस्त्वं सूर्यस्त्वं चन्द्रमास्त्वं ब्रह्मभूर्भुवः स्मरोम् ।।६।। गणादिं पूर्वमुच्चार्य वर्णादिंतदनन्तरम्। अनुस्वारः परतरः। अर्धेन्दुलसितम्। तारेण ऋद्धम्। एतत्तव मनुस्वरुपम्। गकारः पूर्वरूपम्। अकारो मध्यम रूपम्। अनुस्वाश्चान्त्यरूपम्। बिन्दुरुत्तरूपम्। नादः सन्धानम्। संहिता सन्धि। सैषा गणेशविद्या। गणक ऋषिः। निचृद्गायत्री छन्दः। श्रीमहागणपतिर्देवता । ॐ गं गणपतये नमः।।७।। एकदन्ताय विद्महे वक्रतुण्डाय धीमहि। तन्नो दन्तिः प्रचोदयात्।।८।। एकदन्तं चतुर्हस्तं पाशमंकुशधारिणम्। रदं च वरदं हस्तैर्बिभ्राणं मूषकध्वजम्। रक्तं लम्बोदरं शूर्पकर्णकं रक्तवाससम्। रक्तगंधानुलिप्ताङ्गं रक्तपुष्पैः सुपूजितम्। भक्तानुकम्पिनं देवं जगत्कारणमच्युतम्। आविर्भूतं च सृष्ट्यादौ प्रकृतेः पुरुषात्परम्। ऐवं ध्यायति यो नित्यं सयोगी योगिनां वरः ।।९।। नमो व्रातपतये । नमो गणपतये । नमः प्रमतपतये । नमस्तेऽस्तु लम्बोदरायैकदन्ताय विघ्ननाशिने शिवसुताय श्रीवरदमूर्तये नमो नमः।।१०।।



सितोपलादि चूर्ण
वारंवार होणाऱ्या
सर्दी-पडशावर उपयुक्त

Authentic · Standardised · Safe · Efficacious
Shree Dhootapapeshwar Standards
SDS Monograph No. 030014
Sitopaladi Choorna

# ।। फलश्रुति।।

एतदथर्वशीर्षं योऽधीते ।। स ब्रह्मभूयाय कल्पते ।। स सर्वतः सुखमेधते ।। स सर्व विघ्नैर्नबाध्यते ।। स पंचमहापापात्प्रमुच्यते ।। सायमधीयानो दिवसकृतं पापं नाशयति ।। प्रातरधीयानो रात्रिकृतं पापं नाशयति ।। सायंप्रातः प्रयुंजानो अपापो भवति ।। सर्वत्राधीयानोऽपविघ्नो भवति ।। धर्मार्थकाममोक्षं च विंदति ।। इदमथर्वशीर्षमशिष्याय न देयम् ।। यो यदि मोहाद्दास्यति स पापीयान् भवति सहस्त्रावर्तनात् यं यं काममधीते तं तमनेन साधयेत् ।।११।। अनेन गणपतिमभिषिंचति स वाग्मी भवति ।। चतुर्थ्यामनश्नन् जपति स विद्यावान् भवति । स यशोवान् भवति ।। इत्यथर्वणवाक्यम् ।। ब्रह्माद्यावरणं विद्यात् न बिभेति कदाचनेति ।।१२।। यो दूर्वांकुरैर्यजति स वैश्रवणोपमो भवति ।। यो लाजैर्यजति स यशोवान भवति ।। स मेधावान् भवति ।। यो मोदकसहस्त्रेण यजति स वाञ्छितफलमवाप्नोति ।। यः साज्यसमिद्भिर्यजति स सर्वं लभते स सर्वं लभते ।।१३।। अष्टौ ब्राह्मणान् सम्यग्ग्राहयित्वा सूर्यवर्चस्वी भवति ।। सूर्यग्रहे महानद्यां प्रतिमासंनिधौ वा जप्त्वा सिद्धमंत्रो भवति ।। महाविघ्नात्प्रमुच्यते ।। महादोषात्प्रमुच्यते ।। महापापात् प्रमुच्यते ।। स सर्वविद्भवति स सर्वविद्भवति ।। य एवं वेद इत्युपनिषत् ।।१४।। ।।शान्ति मंत्र।। ॐ सहनाववतु ।। सहनौभुनक्तु ।। सह वीर्यं करवावहै ।। तेजस्विनावधीतमस्तु मा विद्विषावहै ।।

।।ॐ भद्रं कर्णेभिः शृणुयाम देवाः। भद्रं पश्येमाक्षभिर्यजत्राः ।। स्थिरैरंगैस्तुष्टुवांसस्तनूभिः । व्यशेम देवहितं यदायुः ।। ॐ स्वस्ति न इन्द्रो वृद्धश्रवाः। स्वस्ति नः पूषा विश्ववेदाः ।। स्वस्तिनस्ताक्ष्यो अरिष्टनेमिः । स्वस्ति नो बृहस्पतिर्दधातु ।। ॐ शांतिः । शांतिः ।। शांतिः ।।

इति श्रीगणपत्यथर्वशीर्षं समाप्तम् ।।


समृद्ध, चमकदार व
निरोगी केसांना जपणारे!
धूतपापेश्वर
कांचन®
केश तेल
॥ शिरोभ्यंगार्थ ॥
निरोगी केस व केसांच्या मुळांसाठी
आयुर्वेद उपाय
Authentic • Standardised • Safe • Efficacious
उपलब्धता : १०० मि.ली.


आयुर्वेद पोषक योग
धूतपापेश्वर
आयुर्वेद श्रेष्ठतेची १५० हून अधिक वर्षे
१५०
Shatavari Kalpa
नॅच्युरल इलायची
Shatavari Kalpa
टेस्टी चॉकोलेट
आई आणि बाळाच्या पोषणासाठी
शतावरी कल्प™
ग्रॅन्युल्स
प्रत्येकाच्या आरोग्यासाठी !
१ ते २ चमचा दिवसातून दोनदा दुधासोबत !
श्री धूतपापेश्वर लिमिटेड • शास्त्रोक्त • मानकीकृत • सुरक्षित • उत्तम गुणवत्ता • १४५+ वर्षांची आयुर्वेद परंपरा

# निशामलकी

धूतपापेश्वर

आयुर्वेद श्रेष्ठतेची १५० हून अधिक वर्षे

१५० वर्षांहून अधिक

## मेहेषु धात्री निशे ।

अष्टांगहृदय - ६वे शतक






- रक्तामधील साखरेचे वाढलेले प्रमाण नियंत्रित करणाऱ्या निर्धारित उपचारांसोबत सहयोगी औषध
- शरीराचा उत्साह आणि उर्जा वाढवते
- पाचन क्रिया सुधारण्यास मदत करते
- रसायन असल्याने वाढत्या वयासोबत होणाऱ्या अवयव हानीला रोखण्यास मदत करते
- त्वचेचे आरोग्य टिकवते
- रोगप्रतिकारशक्ती वाढण्यास मदत करते
- जीवनाचा कार्यकाल स्तर उत्तम राखते
- मूत्रप्रवृत्तींच्या वेगांना कमी करण्यास सहायता करते

उपलब्धता: 450 मि.ली. आणि 60 टॅबलेट्स

AS/VS/S/0822


**श्री धूतपापेश्वर लिमिटेड**

१३५, नानुभाई देसाई रोड, खेतवाडी, मुंबई -४०० ००४.

फोन नं.:+९१-२२-६२३४ ६३००, फॅक्स: +९१-२२-२३८८ १३०८

Toll Free : 1-800-2 AYUSH


(Dial AYUSH as in 29874

working days 9:00-17:00 hrs)

E-mail : healthcare@sdlindia.com | www.sdlindia.com



धूतपापेश्वर
आयुर्वेद श्रेष्ठता के १५० से अधिक वर्ष
१५० वर्षों से अधिक
द्राक्षोविन®
स्पेशल
प्रोप्रायटरी
सुप्रीम हेल्थ टॉनिक
भूक वाढवते, पचन सुधारते
Drakshovin
SPECIAL
Supreme Health TONIC
शक्ति व स्फूर्ति वाढवते
बुद्धिला सतर्क ठेवते
द्राक्षा, अश्वगंधा आणि ब्राह्मी
या प्रमुख घटकांपासून निर्मित
पॅक :
३३० मि.लि., ७०० मि.लि.
Authentic · Standardised · Safe · Efficacious
Shree Dhootapapeshwar Standards
SDS Monograph No. 070005
Drakshovin




www.sdlindia.com

शास्त्रोक्त, मानकीकृत, सुरक्षित आयुर्वेद औषधे

# प्रायमरी हर्ब टॅबलेटस्

# प्रस्तुत आहेत नवीन उत्पादने




## अस्थिसंहृता (हडजोड)
टॅबलेट

अस्थि स्वास्थ्यकर




## गोक्षुर
टॅबलेट

मूत्रवह प्रणाली स्वास्थ्यकर




## कुन्दुरु (शल्लकी)
टॅबलेट

संधि स्वास्थ्यकर




## निम्ब (नीम)
टॅबलेट

त्वचा स्वास्थ्यकर

धूतपापेश्वर
आयुर्वेद श्रेष्ठतेची १५० हून अधिक वर्षे

१५० वर्षांहून अधिक

# आता चिंता होईल गुल
# उन्हाळ्यात रहा नेहमी COOL!




## शीतसुधा®

**गरमीपासून सुटका व शीतलता**

नैसर्गिक वाळ्यापासून निर्मित

## गुलकंद
## Gulkand

**नैसर्गिक पित्तशामक आणि दाहनाशक**

प्रवाळ आणि मोती युक्त


श्री धूतपापेश्वर लिमिटेड शास्त्रोक्त, मानकीकृत, सुरक्षित आयुर्वेद औषधे

Authentic · Standardised · Safe · Efficacious

For Health & Trade Enquiries Tollfree: **1800 22 9874** I For online purchase: http://consumerayurved.com